# नियमीत दिवाणी दावा क्र. ११०/२०१० मध्ये निशाणी २१६ व २१८ वरील आदेश

**०१.** वादीने सदरचे अर्ज हे प्रतिवादी क्र. २ सुलक्षणा जाधव हि दिनांक १३.०५.२०२४ रोजी मयत पावल्यामुळे तीचे वारस दाव्यात समाविष्ट करण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मिळण्यासाठी व दुरुस्तीसाठी दाखल केले आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. २ ही दिनांक १३.०५.२०२४ रोजी मयत पावली आहे. वादीच्या कथनाप्रमाणे मयत प्रतिवादी ही धारुर येथील रहीवाशी असल्यामुळे तिच्या निधनाची माहिती वादीला मिळाली नाही. त्यामुळे वादीला तिचे वारस दाव्यात समाविष्ट करण्यासाठी विलंब झाला आहे. मयत प्रतिवादीच्या वारसांनी सदरच्या अर्जावर कोणताही आक्षेप नोंदवीला नाही. प्रतिवादींनी सदरच्या अर्जामध्ये योग्य कारण नमुद नसुन वारसांचे प्रमाणपत्र दाखल केले नाही. त्यामुळे सदरचे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०२. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभीलेख, अर्ज, यांचे अवलोकन केले.

०३. वादीने सदरचा दावा हा वाटपासाठी, स्वतंत्र ताब्यासाठी व निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे दाव्याला कारण जिवंत आहे. दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा हितसंबंध आहे. वादीला मयत प्रतिवादीच्या निधनाची माहिती उशीरा मिळाल्यामुळे दाव्यात मुदतीत तिचे वारस समाविष्ट करता आले नाहीत. मयत प्रतिवादीच्या वारसांची ते मयताचे वारस आहेत याबाबत कोणताही आक्षेप नोंदवीला नाही. वादीने मयत प्रतिवादीविरुदध अबेटमेंन्ट रदद करण्यासाठी अर्ज दाखल केला नाही. परंतु सदरचे प्रकरण हे मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३०.०६.२०२६ रोजीपर्यंत संपवीण्याचे निर्देश दिल्यामुळे सदरचा अर्ज केवळ वादीने अबेटमेंन्ट रदद करण्यासाठी अर्ज दाखल केला नाही, त्यामुळे रदद करणे न्यायोचीत होणार नाही. परंतु वादीने अर्जामध्ये नमुद केलेले कारण हे संयुक्तीक वाटते. वादीने दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकल्यामुळे सदरचे अर्ज हे खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालील आदेश

करीत आहे.

**–: आदेश :–**

१. निशाणी २१६ व २१८ वरील अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतात.
२. वादिने पुढील तारखेला किंवा तारखेपर्यंत प्रतिवादींना खर्च रक्कम रुपये १०००/– दिल्यास मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस दाव्यात समाविष्ट करण्यासाठी झालेला विलंब माफ व अबेटमेंन्ट रदद करण्यात येते.
३. वादिने वरील प्रमाणे खर्च दिल्यास मागणी केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

ठिकाण :– रेणापुर (ज्ञा.म.गित्ते)
दिनांक :– १५/०६/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
रेणापुर